88% 2:12 pm

# श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक


पब्लिक ट्रस्ट नंबर ए-४०५

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, ता. त्र्यंबकेश्वर,

जि. नाशिक, ४२२२१२ फोन : ०२५९४-२३३२१५

Website :- www.trimbakeshwartrust.com Email : trimbakeshwartrust@gmail.com


जावक क्रमांक : 69/2020 दिनांक : 31-10-2020

## जाहीर अल्प मुदत निविदा

तमाम पुरवठादारांना कळविण्यात येते, की देव दीपावलीनिमित्त दि. १२-११-२०२० ते १७-११-२०२० या सहा दिवसांकरिता व त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दि.२८/११/२०२० ते ३०/११/२०२० या तीन दिवसांकरिता त्र्यंबकेश्वर मंदिर, नंदी मंदिर, मंदिराचा संपूर्ण कोट तसेच कोठी हॉल (ऑफिस) येथे भव्य पारंपरिक (लाईटिंग माळा) विद्युत रोषणाई करावयाची आहे. तसेच दि. २९/११/२०२० रोजी त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी श्री त्र्यंबकराजाच्या रथाला विद्युत रोषणाई करणे आहे. तसेच त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी रथ मार्गावर आवश्यकतेनुसार प्रकाश योजना व त्याकरिता लागणारी जनरेटरची व्यवस्था करणे आहे. (रथ मार्ग मंदिर उत्तर महाद्वारापासून, लक्ष्मीनारायण चौकामार्गे, कुशावर्त चौकापर्यंत)

**पारंपरिक विद्युत रोषणाईसाठी खालील तपशीलवारप्रमाणे दर मागविण्यात येत आहेत.**

| | | |
|---|---|---|
| १) | एल.ई.डी. माळा १०० फुटी | १००० नग |
| २) | मल्टिकलर एल.ई.डी. फोकस | ८० नग |
| ३) | मेटल लाईट | ६० नग |
| ४) | मंदिर कोटास एल.ई.डी. माळा १०० फुटी | २०० नग |
| ५) | फीक्सेल बेल्ट ८० फुटी | १०० नग |
| ६) | शूटिंग फोकस रथ मार्गास १ दिवसाकरिता | ३० नग |

तरी इच्छुक पुरवठादारांनी निविदा प्रसिद्ध झालेपासून ४ दिवसांत (म्हणजेच दि. ०४/११/२०२० रोजी संध्याकाळी ०५:०० वाजेपर्यंत) देवस्थान ट्रस्ट कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत आपले दरपत्रक सीलबंद लिफाफ्यात सादर करावेत. वेळेत सादर होणाऱ्या निविदांचाच विचार केला जाईल. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार देवस्थान ट्रस्ट राखून ठेवीत आहे.

**टीप :-**

१) संपूर्ण रोषणाईसाठी लागणारी जनरेटरची व्यवस्था पुरवठादाराने करावयाची आहे.

२) निविदा सादर करताना आपण केलेल्या विविध कामांचे फोटोग्राफ्स निविदा सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) विद्युत रोषणाईच्या पूर्ण कालावधीत विद्युत रोषणाईची देखभाल व दुरुस्तीसाठी आपले कुशल तंत्रज्ञ पूर्ण वेळ हजर असणे आवश्यक आहे.

सही/-

(शिक्का)

प्रशासकीय अधिकारी
श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट,
श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक